# शंकतनुराव किर्लोस्कर

महाराष्ट्रातील आद्य कारखानदार म्हणून प्रसिध्द असणारे लक्ष्मणराव किर्लोस्कर यांनी उदयोगाचा पाया घातला. व त्याचा वारसा पुढं त्यांचे सुपूत्र शंतनुराव किर्लोस्कर यांनी चालविला आणि विस्तार केला.  शंतनुरावांचा जन्म  28 मे, 1903 रोजी झाला.

किर्लोस्करवाडीच्या मायाप्पा मंदिरात त्यांनी आपल्या शिक्षणाचा श्रीगणेशा केला. प्रगत परदेशी शिक्षण घेऊन त्यांनी किर्लोस्कर उदयोग समुहाच्या कारभारात लक्ष घातले. यमुनाताई किर्लोस्कर या त्यांच्या पत्नी. शंतनुरावांनी किर्लोस्कर यांनी उदयोगसमुहाचे नेतृत्व केले. त्यांनी देशातील अनेक उदयोगांना मार्गदर्शन केले. आणि भारतीय उदयोगाचे नेतृत्वही केले. परखड मतप्रदर्शनाबद्दल त्यांची ख्याती होती. खाजगी कारखानदार म्हणजे किंमतीत सतत वाढ करणारा , नफा कमावणे हा एकमेव हेतू असलेला असे त्यांचे वर्णन होत असे. देशाच्या आर्थिक वाढीसाठी नियंत्रणे, नियोजन आवश्यक आहे. अशी सरकारची भूमिका होती. या भुमिकेवर शंतनुरावांनी हल्ला केला होता. परदेशात त्यांनी भारतीय उदयोगाची वकीली केली..

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज या संस्थेचे ते अध्यक्ष होते. फिक्की या संस्थेचे अध्यक्षपदही त्यांनी भुषविले. भारतीय उदयोगांनी आधुनिक व्यवस्थापन आणले पाहिजे असे त्यांनी आग्रही प्रतिपादन केले.

उदयोग विश्वाकडून सरकारकडून आणि जनतेकडून त्यांचा गौरव झालेला आहे. अनेक उच्च सन्मान त्यांना मिळाले. 1965 मध्ये पद्मभुषण पुरस्काराने गौरविण्यात आले.

किर्लोस्करवाडीतून किर्लोस्कर मासिक प्रसिध्द होत होती तेव्हा आणि नंतर अनेक साहित्यिक , राजकीय नेते, कार्यकर्ते, कलावंत किर्लोस्करवाडीला भेट देत. त्यांच्या भाषणातून, विचारातून एक प्रकारची प्रगल्भता लोकांच्यात निर्माण झाली.